# महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२

## शिक्षा म्हणून निवृत्ती वेतन रोखून ठेवणे / काढून घेणे

(नियम क्रमांक २६ व २७)

---

**२६. चांगल्या वर्तणूकीवर निवृत्तीवेतन अवलंबून असणे**

(१) प्रत्येक निवृत्तीवेतन देण्यामागे पुढील काळांतील चांगली वर्तणूक ही गर्भित शर्त असेल. जर निवृत्तीवेतनधारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल किंवा गंभीर गैरवर्तणुकीबद्दल अपराधी ठरविले असेल तर, शासन लेखी आदेशाद्वारे निवृत्तिवेतन किंवा त्याचा काही भाग, कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून धरु शकेल किंवा काढून घेऊ शकेल :

मात्र, निवृत्तिवेतनाचा काही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा उरलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम, शासनाने ठरवून दिलेल्या किमान निवृत्तीवेतनाच्या रकमेहून कमी केली जाणार नाही.

(२) न्यायालयाने निवृत्तीवेतनधारकाला गंभीर गुन्ह्याबद्दल अपराधी ठरवले असेल तेव्हा, अशा अपराधसिद्धी संबंधीच्या न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात पोटनियम (१) अन्वये कार्यवाही केली जाईल.

(३) पोटनियम (२) खाली न येणाऱ्या प्रकरणात, शासनाला निवृत्तिवेतनधारक गंभीर गुन्ह्याबद्दल प्रथमदर्शनी दोषी वाटत असेल तर, शासन पोटनियम (१) अन्वये आदेश काढण्यापूर्वी, मोठी शिक्षा देण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ व ९ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतींचे अनुपालन करील.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संबंधात, पोटनियम (१) अनुसार आदेश काढण्यापूर्वी आयोगाशी विचारविनिमय करण्यात येईल.

सपष्टीकरण – या विषयात –

(ए) “गंभीर गुन्हा” ह्या शब्दप्रयोगात शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा अधिनियम एकोणीस) खालील गुन्ह्यांचा समावेश होतो.

(बी) “गंभीर गैरवर्तणूक” या शब्दप्रयोगात, जनसामान्यांच्या हिताला किंवा राज्याच्या सुरक्षिततेला बाधा येईल अशा रीतीने शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा अधिनियम एकोणीस) च्या कलम ५ मध्ये उल्लेखिलेली (शासनाचे पद धारण करत असता मिळवलेली) कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी, परवलीचा शब्द अथवा कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती कळवणे किंवा उघड करणे अंतर्भूत आहे.

## **२७. निवृत्तीवेतन रोखून ठेवण्याचा किंवा काढून घेण्याचा शासनाचा अधिकार**

(१) निवृत्तीवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत, तसेच सेवानिवृत्त होऊन पुनर्नियुक्तीनंतरच्या त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभीर गैरवर्तणूकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, शासनाला लेखी आदेशाद्वारे, निवृत्तीवेतन किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल; आणि शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुलीदेखील अशा निवृत्तीवेतनातून पूर्णतः किंवा अंशतः करण्याचा शासन आदेश देईल.

मात्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेमधील पद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांच्या संबंधात कोणतेही अंतिम आदेश देण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यात येईल :

आणखी असे की, निवृत्तिवेतनाचा कोणताही भाग रोखून ठेवला असेल किंवा काढून घेतला असेल तेव्हा, उरलेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम शासनाने ठरवून दिलेल्या किमान रकमेपेक्षा कमी केली जाणार नाही.

(२) (ए) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत सताना त्याच्याविरुद्ध पोटनियम (१) मध्ये उल्लेखिलेली विभागीय कार्यवाही सुरु करण्यात आली असेल तर, ती कार्यवाही शासकीय कर्मचाऱ्याच्या अंतिम निवृत्तीनंतर, या नियमाखालील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि शासकीय कर्मचारी सेवेत राहिला असता तर ज्या पद्धतीने ती चालू ठेवण्यात आली असती त्याच पद्धतीने ती, ज्या प्राधिकाऱ्याने सुरु केली त्याच्याचकडून चालू ठेवली जाईल व समाप्त केली जाईल.

(बी) शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर सेवेत असताना त्याच्याविरुद्ध विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर-

(एक) शासनाच्या मंजुरीशिवाय ती चालू केली जाणार नाही,

(दोन) अशी कार्यवाही सुरु करण्यापूर्वीच्या चारापेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत घडलेल्या घटनेसंबंधातील ती असता कामा नये, आणि

(तीन) शासन निदेशित करील अशा प्राधिकाऱ्याकडून व अशा ठिकाणी आणि ज्या विभागीय कार्यवाहीमध्ये शासकीय कर्मचारी सेवेत असताना त्याच्या बडतर्फीचा आदेश देता येईल अशा विभागीय कार्यवाहीच्या पद्धतीनुसार चालवण्यात येईल.

(३) जर शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी किंवा पुनर्नियुक्त झाल्यानंतर, सेवेत असताना त्याच्याविरुद्ध एखादी न्यायिक कार्यवाही सुरु केली नसेल तर, अशी कोणतीही न्यायिक कार्यवाही, ती सुरु करण्यापूर्वी चारपेक्षा अधिक वर्षाच्या कालावधीत उद्‌भवलेल्या वादकारणासंबधात किंवा घडलेल्या घटनेसंबंधात, सुरु केली जाणार नाही.

(४) जो शासकीय कर्मचारी नियम वयमान होताच किंवा अन्यथा सेवानिवृत्त झाला असेल आणि ज्याच्याविरुद्ध कोणतीही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही सुरु केली असेल किंवा पोटनियम (२) खाली विभागीय कार्यवाही पुढे चालू ठेवण्यात आली असेल त्याच्या बाबतीत, नियम १३० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्यात येईल.

(५) निवृत्तीवेतन रोखून ठेवावयाचे नाही किंवा काढून घ्यावयाचे नाही असे शासनाने ठरविले असेल, परंतु निवृत्तीवेतनातून आर्थिक नुकसानीची वसुली करावयाची असा आदेश दिला असेल तेव्हा, या नियमाच्या पोटनियम (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून, सामान्यपणे शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास अनुज्ञेय असलेल्या निवृत्तिवेतनाच्या एकतृतीयांशाहून अधिक दराने वसुली केली जाणार नाही.

(६) या नियमाच्या प्रयोजनासाठी, -

(ए) शासकीय कर्मचाऱ्यास किंवा निवृत्तिवेतनधारकास ज्या तारखेला आरोपपत्र देण्यात आले असेल त्या तारखेस, किंवा शासकीय कर्मचाऱ्याला आधीच्या ज्या तारखेपासून निलंबनाधीन ठेवले असेल अशा तारखेस, विभागीय कार्यवाही सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.

(बी) न्यायिक कार्यवाही —

(एक) फौजदारी कार्यवाहीच्या बाबतीत, दंडाधिकारी जिची दखल घेतो अशी तक्रार किंवा प्रतिवेदन पोलीस अधिकाऱ्याने ज्या तारखेस दाखल केले असेल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल, आणि

(दोन) दिवाणी कार्यवाहीच्या बाबतीत, वादपत्र न्यायालयाला ज्या तारखेस सादर करण्यात येईल त्या तारखेस सुरु केली असल्याचे मानण्यात येईल.